Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स - २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 1139 दि. 05 JUN 2026

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक,

— : परिपत्रक :—

सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- महाराष्ट्र शासनाच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती बाबत.

संदर्भ :- युवा - सेना शिवसेना कोल्हापूर जिल्हा मंजित किरणराव माने जिल्हा युवा अधिकारी, युवासेना यांचे दिनांक २७/०५/२०२६ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाकडून महाडीबीटी पोर्टल मार्फत एस.सी (SC), ओबीसी (OBC), एसईबीसी (SEBC) ई.डब्ल्यू.एस (EWS),ओपन (Open) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येतात असे कळविले आहे.

तेव्हा वरील संदर्भिय पत्रानुसार महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना प्रवेश देतेवेळी शासन नियमाचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी हि विनंती, सोबत संदर्भिय पत्र जोडले आहे.

कळावे

आपला विश्वासू

(डॉ.पी.एस.पांडव)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग



# युवा सेना

शिवसेना

कोल्हापूर जिल्हा

मंजीत किरणराव माने

जिल्हा युवा अधिकारी, युवासेना



प्रति

**मा.कुलसचिव,**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

SHIVAJI UNIVERSITY
Registrar's Office
Date - 27-5.2026
Inward No 1027
To Whom ADE T7

दि- २८/०५/२०२६

**विषय - महाराष्ट्र शासनाच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती बाबत..**

महोदय,

वरील विषयास अनुसरून महाराष्ट्र शासनाकडून महाडीबीटी पोर्टल मार्फत एस.सी, ओबीसी, एसईबीसी, ई.डब्ल्यू.एस.,ओपन प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येतात. पण आपल्या अंतर्गत येणाऱ्या अनेक अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकडून पूर्ण प्रवेश शुल्क भरून घेतले जाते. वास्तविक पाहता विद्यार्थ्यांनी ज्या प्रवर्गातून प्रवेश घेतला आहे व ते ज्या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरत असतील. तर शासन निर्णयाप्रमाणे त्यांचे प्रवेश शुल्क भरून घेणे गरजेचे आहे पण वास्तविक पाहता अनेक विनाअनुदानित महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून पूर्ण शुल्क भरल्याशिवाय परीक्षेत बसून न देणे, हॉल तिकीट वर सही न देणे, प्रवेश प्रक्रिया थांबवणे असे प्रकार करतात. अशा प्रकारच्या तक्रारी आमच्या युवा सेनेस प्राप्त झालेल्या आहेत. यामध्ये एमबीए शिक्षण देणाऱ्या संस्था व शिवाजी विद्यापीठ अंतर्गत येणारे बी.एड., एम.एड., विधी महाविद्यालय यांचा देखील समावेश आहे.

तरी आपण वरील प्रश्नाकडे तात्काळ लक्ष देऊन आपल्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६ च्या प्रवेशावेळी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती बाबत जागृती करण्यासाठी महाविद्यालयाने फलक लावणे व आपण आपल्या स्तरावर महाविद्यालयास आदेश देण्यात यावा की विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवर्गात नुसार मिळणाऱ्या शिष्यवृत्ती प्रमाणे त्यांची प्रवेश फी भरून घेण्यात यावी. जी महाविद्यालय विद्यार्थ्यांना पुर्ण फी साठी तगादा लावतील अशा महाविद्यालयांना आम्ही युवा सेना स्टाईलने उत्तर देवु. विद्यार्थी हिताचा व्यापक विचार करून आपण महाविद्यालयांना आदेश द्यावा ही नम्र विनंती.

पवन जाधव
कार्यकारिणी सदस्य युवासेना

आपला विश्वासू

मंजीत किरणराव माने

प्रत

१) मा. सहसंचालक उच्च व तंत्रशिक्षण, कोल्हापूर विभाग.

२) मा.आयुक्त समाजकल्याण, कोल्हापूर

T-2
M. pwnp
२७/५/२६


* घर नं. २५४०, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
* संपर्क : +९१ ९८२३७१२०५३, ८३०८६४५२५२